वर्ष : ०४ | अंक: १५ | मुंबई, मंगळवार ६ मार्च २०१८ ते १२ मार्च २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 सरकारच्या धोरणांमुळे सामान्य माणूस उद्ध्वस्त

3 → हाल कधी संपणार ?

सत्तेच्या भांगेने भाजपाचे डोके बधिर झाले ← 4



## पंतप्रधान 'ब्लॅक मनी' भारतात आणू शकले नाहीत पण 'व्हाईट मनी' विदेशात धाडत आहेत–काँग्रेस


### नीरव मोदी प्रकरणावरून पंतप्रधानांवर काँग्रेसची टीका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काळा पैसा भारतात आणण्याचे आश्वासन दिले होते. ते पाळले नाहीच पण आता पंतप्रधान देशातला पांढरा पैसा म्हणजेच लोकांच्या घामाची आणि कष्टाची कमाई विदेशात पाठवत आहेत अशी टीका काँग्रेसचे वरिष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांनी केली. भाजपाने सोमवारी बँक घोटाळ्यांसाठी काँग्रेसच जबाबदार असल्याचा आरोप करत काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी आणि माजी केंद्रीय अर्थमंत्री पी चिदंबरम यांच्यावर निशाणा साधला होता. याच टीकेला उत्तर देत गुलाम नबी आझाद यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हा आरोप केला आहे.**

नीरव मोदी पीएनबीत घोटाळा करून पळून गेला यासाठी केंद्र सरकारच जबाबदार आहे. तसेच कायम हे सांगितले जाते की पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगभरातील अनेक देशांचा दौरा करून आल्याने ते जगभरात लोकप्रिय आहेत. मग पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या लोकप्रियतेचा उपयोग करून घोटाळेबाजांना भारतात आणण्यासाठी प्रयत्न का करत नाहीत? भारतातील कर्जबुडवे परदेशात जाऊन आरामात राहतात. जनतेचा कष्टाचा आणि घामाचा पैसा अशा कर्जबुडव्यांच्या माध्यमातून विदेशात पाठवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत असेही आझाद यांनी म्हटले आहे.



आजच भाजपाचे नेते रविशंकर प्रसाद यांनी पत्रकार परिषदेत बँकांचे घोटाळे काँग्रेसच्या काळातले आहेत असा आरोप केला. तसेच राहुल गांधी आणि पी चिदंबरम यांनी ७ कंपन्यांना नफा मिळवून देण्यासाठी खास प्रयत्न केले. त्यासाठी पी चिदंबरम यांनी पदाचा गैरवापर केला असेही प्रसाद यांनी म्हटले होते. या सगळ्या आरोपांना गुलाम नबी आझाद यांनी उत्तर दिले आहे.




## जर्नलिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्राची नवी कार्यकारणी जाहीर

### पोलीस बातमी पत्रचे श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांची उपाध्यक्षपदी निवड






दिनांक ३ मार्च २०१८ रोजी जर्नलिस्ट युनिअन ऑफ महाराष्ट्र च्या वतीने नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामध्ये पोलिस बातमी पत्रचे श्री. दिपक मोरेश्वर नाईकयांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. पत्रकारांच्या सुरक्षेसाठी व मागण्यांसाठी गावोगावच्या पत्रकारांना जोडून त्यांच्या हितासाठी सदर युनियनने या जिल्हानिहाय नियुक्त्या केल्या आहेत. युनियनचे अध्यक्ष श्री. नारायण पांचाळ यांनी काही महत्वाचे निर्णय पत्रकारांसाठी घेऊन प्रत्येक महानगरपालिकेमध्ये चाललेला भष्ट्राचार तसेच पत्रकारांवर होणारे हल्ले यावर आवाज उठवण्यासाठी सदर नियुक त्यांचा विस्तार केला. यावेळी जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र या संघटनेच्या मुंबई कार्यालयाचे दादर येथे उद्घाटन संघटनेचे अध्यक्ष नारायण पांचाळ, उपाध्यक्ष जयराम सावंत, डॉ शांताराम कारंडे, श्री. दिपकमोरेश्वर नाईक व सचिव हेमंत सावंत व मुंबई अध्यक्ष भीमराव धुळप यांच्या उपस्थितीत शनिवार दि. ३ मार्च २०१८ रोजी सायं ५.०० वा. करण्यात आले. पत्रकारितेतील समस्या सोडवण्यासाठी सदर युनियन काम करत असून पुढील रणनीती ठरविण्यासाठी महत्वाची बैठक देखील पार पडली. त्यावेळी पुण्यनगरीचे वरिष्ठ उपसंपादक जयवंत बामणे, अनेक पत्रकार व संबधित मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी मुंबई तसेच प्रदेश कार्य कारणीच्या नियुक्त्या मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आल्या.



## मुंबईसह राज्याचा पारा आणखी वाढणार

**मुंबई-** मार्चच्या पहिल्याच आठवड्यात मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात तापमानाचा पारा वाढल्याने सर्वत्र उकाडा जाणवत आहे. हे तापमान पुढील काही दिवसात आणखी वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.पुढील आठवड्याभरात मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात २ ते ३ अंश सेल्सिअसने तापमान वाढणार आहे, असं हवामान खात्याकडून सांगण्यात आलं आहे.गेल्या वर्षीपेक्षा यंदा सरासरी ०.५ ते १ अंश सेल्सिअस तापमानात वाढ पाहायला मिळणार आहे. याशिवाय फेब्रुवारी महिन्यात ज्याप्रकारे अवकाळी पाऊस पडून गारपीट झाली होती, तशीच परिस्थिती पुढील २ ते ३ दिवसात दिसण्याची शक्यता आहे. मात्र ही गारपीट कमी प्रमाणात होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.याशिवाय पुढील काही दिवस मराठवाडा, विदर्भात सरासरी तापमान ३५ ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

## सौजन्य व्हॉट्सअप




## केवळ प्रसिद्धीच्या लोभापायी शिवजयंतीच्या निमित्ताने शिवाजी महाराजांच्या फोटोच्या बाजूला भाजपच्या कार्यकर्त्यांचे फोटो लावून महाराजांचा अपमान केल्याबद्दल

## भाजपा नगरसेवक अरविंद शेट्टी यांच्यावर गुन्हा दाखल



मिरा रोड सिल्वर पार्क येथे महाराष्ट्राचे आराद्य दैवत श्री. शिवाजी महाराजांच्या अपमानास्पद व अनाधिकृत बॅनर लावल्याप्रकरणी मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष श्री. गोवर्धन देशमुख व संपूर्ण शिवसंघटना व मराठा मावळयांनी कनकिया, मिरा रोड पोलिस स्टेशनमध्ये सतत पाठपुरवठा करुन सदर प्रकरणी अरविंद शेट्टी यांच्यावर भा.द.वि. कलम ५०१, ५०६, ३२३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यास पोलिसांना भाग पाडले. संतप्त शिवप्रेमींनी या भाजपच्या नगरसेवकावर ताबडतोब करवाई करावी यासाठी मिरा रोड पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना सतत पाठपुरावा केला होता. शेवटी मिरा रोड पोलिस निरीक्षक श्री. वसंत लब्दे यांनी सदरची करवाई केली.

## ३२०० कोटीच्या टीडीएस घोटाळयाचा पर्दाफाश

**मुंबईः आयकर विभागाने ३२०० कोटी रुपयांच्या टीडीएस (ऊअए) घोटाळयाचा पर्दाफाश केला आहे. हा घोटाळा करणाऱ्या ४४७ कंपन्यांची माहिती विभागाला मिळाली आहे. या कंपन्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून टीडीएस कपात केली. मात्र ती रक्कम सरकारकडे जमा केली नाही. याउलट टीडीएसचे पैसे कंपनीतच गुंतवले, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.**




सूत्रांच्या माहितीनुसार, आयकर विभागाच्या टीडीएस शाखेने संबंधित कंपन्यांची चौकशी सुरू केली आहे. अनेक जणांविरोधात वॉरंटही जारी केले आहे. या घोटाळ्यातील आरोपी कंपन्या आणि त्यांच्या मालकांविरोधात कारवाई करण्यात येत आहे. प्राप्तिकर कायद्यांतर्गत या प्रकरणांत दंड आणि तीन महिने ते सात वर्षे कारावासही होऊ शकतो.

या घोटाळ्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आरोपींमध्ये एका प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिकाचाही समावेश आहे. तो राजकारणाशी संबंधित असून, त्यानं कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली टीडीएसची रक्कम स्वतःच्या व्यवसायासाठी वापरली आहे. अन्य आरोपींमध्ये प्रॉडक्शन हाऊसपासून इन्फ्रा कंपन्यांचे मालकही आहेत. अलिकडेच केलेल्या पडताळणीमध्ये अशी ४४७ प्रकरणे उजेडात आली आहेत.

# सरकारच्या धोरणांमुळे सामान्य माणूस उद्ध्वस्त




**मुंबई - राज्य व केंद्र सरकार मोठ-मोठ्या घोषणा करून सर्वसामान्यांची फसवणूक करत आहे. रोजगार देण्यात सरकार अपयशी ठरले आहे. सरकारच्या धोरणांमुळे सामान्य व्यक्ती उद्ध्वस्त होत असून बँका धोक्यात आल्या आहेत, या सरकारला परत पाठवून परिवर्तन करण्याची वेळ आली आहे, असा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला.आझाद मैदानात बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. पवार म्हणाले, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना महिन्याभराच्या सर्व खर्चासाठी केवळ ९०० रुपये दिले जातात. रेशनवर गहू व तांदूळ देण्याऐवजी पशुखाद्य असलेला मका दिला जात आहे.**

त्यामुळे सामान्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. बेकारीचे थैमान वाढत आहे. गुन्ह्यांच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. नोटा बंदीचा निर्णय घेतल्याचा फटका सहकारी बँकांना व त्यामध्ये पैसे भरलेल्या नागरिकांना बसला आहे. मात्र, आता आरबीआय आपली जबाबदारी झटकत आहे. नीरव मोदी प्रकरणामुळे लहान उद्योजकांकडे बँका संशयाने पाहू लागल्या आहेत. सत्तेचा पुरेपूर गैरवापर केला जात आहे. नागरिक सरकारच्या अच्छे दिनला कंटाळले असून जुने दिवस मागत असल्याचे पवार म्हणाले. राज्य सरकार नादान सरकार असून रिक्त पदे भरण्याऐवजी बेरोजगारी वाढवली जात आहे. महिलांवरील अत्याचारामध्ये वाढ होत आहे. सरकार केवळ घोषणाबाजीमध्ये मश्गुल आहे, त्यांना परत पाठवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले, सरकारकडून प्रचंड फसवणूक केली जात आहे. सेना-भाजपची मिलीभगत आहे. मराठी भाषेची गळचेपी झाल्याची नैतिक जबाबदारी शिवसेनेने घेतली नाही. एमयुटीपी प्रकल्प आम्ही सुरू केला तेव्हा आमची चेष्टा केली गेली. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे बेरोजगार अधिक अडचणीत आले आहेत. सत्ताधारी दोन्ही पक्षातील वितंडवाद सर्वांसमोर आले आहेत. मंत्रालयाची सर्कस बनवण्याचे काम सरकारने केले आहे.

# होळीनिमित्त लाखो लिटर पाण्याची नासाडी

**मुंबई-** मुंबईतील होळी गेल्या काही वर्षांपासून अधिक ग्लॅमरस झाली आहे. हा सण रंग, थंडाई, जिलेबी यापुरता मर्यादित न राहता रेन डान्स आणि डीजेच्या तालावर रंगू लागला आहे. एकीकडे राज्य सरकार पर्यावरणस्नेही होळी आणि धुळवडीचे आवाहन करत असताना दुसरीकडे शुक्रवारी मुंबईमध्ये लाखो लिटर पाणी वाया गेल्याचे चित्र दिसले. अनेक मोठ्या गृहसंकुलांमध्ये तसेच स्विमिंग पूल, टँकची सोय असलेल्या ठिकाणी तर धुळवडीचा उत्साह बॉलिवूडच्या चित्रपटांप्रमाणे असतोच, मात्र आता हा ट्रेण्ड लहान सोसायट्यांमध्येही दिसू लागला आहे. अवघ्या शंभर घरांच्या इमारतींच्या आवारातही खास रेन डान्ससाठी सोय करण्यात आली



होती. त्याशिवाय स्पीकरचीसुद्धा सोय करण्यात आली होती. टँकरने पाणीपुरवठा करून इमारतींच्या टाक्या भरण्यात आल्या. त्यानंतर सकाळी सात वाजल्यापासूनच मुंबईच्या विविध भागांमध्ये धुळवडीचा उत्साह दिसू लागला. अनेक ठिकाणी दुपारी बारापर्यंत हा रेन डान्स रंगला होता. काही ठिकाणी खास अभिनेत्री श्रीदेवी यांची गाणी वाजवण्यात आली. दहावीची परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांना या आवाजाचा त्रासही झाला. मात्र दुपारपर्यंत हा आवाज थंडावला. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी कृत्रिम रंगांच्या मदतीनेच धुळवड साजरी झाली. मात्र काही ठिकाणी खास नैसर्गिक रंगांचा आवर्जून वापर केला गेला.

# धनंजय आणि पंकजा मुंडे वाद विकोपाला

## बहीण-भावामधील संघर्ष अधिक तीव्र

**मुंबई-** ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांच्यातील वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. विधान परिषदेतील प्रश्नाबाबतच्या भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे अस्वस्थ झालेल्या धनंजय मुंडे यांनी आज सरकारला थेट आव्हान देत दररोज एका मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची सीडी सभागृहात सादर करण्याचा इशारा दिला. एवढेच नव्हे तर त्यांनी ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे याच्या स्वीय सहाय्यकावरील आरोपांबाबतची एक सीडी सभागृहात सादर केली. त्यामुळे मुंडे भावंडामधील वाद पुन्हा पेटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विधान परिषदेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याच्या आरोपांबाबत सभागृहात खुलासा करताना मुंडे यांनी आक्रमकपणे



सरकारवर हल्लाबोल केला. गेल्या तीन वर्षांत सरकारमधील मंत्र्यांचा भ्रष्टाचार उघडकीस आणल्यानेआणि दिवसांपूर्वी सरसघंचालकांवरही टीका केल्याने केवळ बदनाम करण्यासाठी कटकारस्थान रचण्यात आल्याचा आरोप मुंडे यांनी केला. यावेळी त्यांनी मंत्री आणि काही खात्यांमधील भ्रष्टाचार उघड करणार असल्याचे सांगत ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांचे परळीतील स्वीय सहाय्यक प्रदीप कुलकर्णी यांनी ग्रामीण भागात लोकप्रतिनिधींकडून सुचवण्यात येणाऱ्या कामात पैसे मागितल्याबातची कथित ऑडिओ टेप सादर केली. त्यावर ही सीडी बनावट असून आपल्या स्वीय सहाय्यकाने त्याबाबच स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्हाही दाखल केल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# पॅनकार्ड गुंतवणूकदारांना दिलासा

**मुंबई-** गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या पॅनकार्ड क्लब कंपनीच्या मालमत्ता जप्त केल्या असून सर्व गुंतवणुकदारांचे पैसे परत दिले जातील, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना दिले. या कंपनीचा मुख्य संचालक सुधीर मोरवेकर मृत असून इतर सर्व संचालकांना अटक करण्याची कारवाई सुरू आहे, लवकरच उर्वरित आरोपींना अटक केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. पॅनकार्डच्या गुंतवणूकदारांच्या प्रश्नाबाबत काँग्रेसचे सतेज पाटील यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला त्यांनी उत्तर दिले. सरकारने आजपर्यंत या कंपनीवर कोणती कारवाई केली, सेबीने कंपनीच्या मालमत्ता जप्त केल्या आहेत काय, असा सवाल पाटील




यांनी केला होता. पॅनकार्ड क्लब कंपनीने टाइम शेअर्स विकले होते. यातून गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याची बाब समोर आली आहे. एकूण ५१ लाख गुंतवणूकदार असून त्यामध्ये सर्वाधिक महाराष्ट्रातील गुंतवणूकदार आहेत. सेबीने कंपनीच्या मालमत्तेबाबत विल्हेवाट लावू नये, अशी सूचना करून त्याची सर्व माहिती देण्याचे आदेश दिले आहेत. ५१ लाख गुंतवणुकदारांचे सात हजार ३५ कोटी रुपये तीन महिन्यांत परत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नवीन गुंतवणूक करण्यास प्रतिबंध करून मालमत्तेची विल्हेवाट न लावण्याबाबत स्पष्ट आदेश देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पॅनकार्ड क्लब कंपनीने सिक्युरिटीज ॲफिलेट ट्रिब्युनलकडे केलेले अपील फेटाळल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कंपनीच्या ३४ स्थावर मालमत्ता सेबीने जप्त केल्या आहेत. त्यांच्या मालमत्तेच्या लिलावांची प्रक्रिया सेबीमार्फत सुरू आहे. प्रारंभी तीन हजार कोटींची व नंतर दीड हजार कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. कंपनीने केलेल्या फसवणुकीबाबतचे राज्यात सहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यातील एक गुन्हा न्यायप्रविष्ट असून पाच गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. यातील आरोपी कोणत्याही परिस्थितीत पळून जाणार नाही याची व्यवस्था करण्यात आली आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

# मुंबईत 'ऑइल गँग' सक्रिय; महागड्या गाड्या लक्ष्य

**मुंबई-** 'थांबा... तुमच्या गाडीतून ऑइल सांडतेय, धूर निघतोय' असा सावधानतेचा इशारा करायचा. गाडी तपासणीसाठी चालक खाली उतरताच गाडीतून किमती ऐवज घेऊन पसार होणारी



'ऑइल गँग' मुंबईत सक्रिय झाली आहे. गेल्या आठवड्यात अशा प्रकारे लूट झाल्याच्या पाच घटनांची नोंद मुंबई पोलिसांच्या दप्तरी झाली आहे. यामध्ये भीमसेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षांसह बड्या व्यावसायिकांच्या गाडीतूनही चोरी झाली आहे. त्यामुळे अशा टोळ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन मुंबई पोलिसांकडून करण्यात येत आहे.

चेंबूर वाशी नाका परिसरात भीमसेना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आर.आर. पांडियन कुटुंबीयांसोबत राहतात. गेल्या चार वर्षांपासून अमजद आखील पठाण (२३) त्यांच्याकडे चालक म्हणून काम करतो. सोमवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास पांडियन यांना त्याने धारावी येथील कार्यालयात सोडले. पठाणने माहीम-सायन लिंक रोड परिसरात गाडी पार्क केली. त्याच दरम्यान एक तरुण तेथे आला. त्याने गाडीमधून तेल गळत असल्याची माहिती दिली. पठाणने खाली उतरून बोनेट तपासले. मात्र, कुठेही लिकेज आढळून आले नाही. पुन्हा गाडीत येऊन बसणार तोच गाडीतील लॅपटॉप, बॅग, पैसे चोरीला गेल्याचे लक्षात आले. ही बाब पांडियन यांना समजताच त्यांच्या सांगण्यावरून पठाणने धारावी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.

# डिझेल तस्करी करणारी टोळी अटकेत

## परदेशी मालवाहू जहाजांच्या संगनमताने कारभार; परदेशी जहाजांचे कप्तान, अभियंतेही सहभागी

**मुंबई - परदेशी मालवाहू जहाजांमधील डिझेल चोरून विकणाऱ्या टोळीला गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाने अटक केली. या टोळीकडून तब्बल ५ टन चोरट्या डिझेलचा साठा, दोन स्पीड बोट आणि एक गलबत हस्तगत करण्यात आले. या चोरीत परदेशी जहाजांचे कप्तान, अभियंते आणि खलाशीही सहभागी असल्याची माहिती चौकशीतून पुढे आली आहे.**

छोटू वर्मा, अब्दुल शेख, जलालूद्दीन काझी, शाहिद शेख, अल्लामीन मंडल अशी अटकेत असलेल्या आरोपी तस्करांची नावे आहेत. यापैकी छोटू या टोळीचा म्होरक्या आहे. मुंबई बंदरावर जागेची उपलब्धता नसते तेव्हा अनेक जहाजे खोल समुद्रात थांबून जागा उपलब्ध होण्याची वाट पाहात अनेक दिवस थांबतात. अशा जहाजांवरील कप्तान, अधिकारी, खलाशांना खाण्यापिण्यासोबत अन्य वस्तूंचा पुरवठा करण्याच्या बहाण्याने टोळी सलगी वाढवते. ओळख झाल्यानंतर जहाजातील




डिझेलसाठ्याच्या अवैध विक्रीचा विषय पुढे येतो. या टोळीने मालमत्ता कक्षाला दिलेल्या माहितीनुसार ही अवैध विक्री जहाजावरील अधिकाऱ्यांच्या संगनमताने होते.

हजारो समुद्रीमैल कापून मुंबई वा देशाच्या विविध बंदरावर परदेशी मालवाहू जहाजे येतात. या प्रवासासाठी ठरलेला डिझेलसाठा बोटीवर असतो. कमी पडला तर विकत घेण्याची परवानगी असते. कप्तानाला डिझेलचा हिशेब संबंधित कंपनीला द्यावा लागतो. मात्र प्रवासादरम्यान अनेकदा वाऱ्याचा वेग पाहून काही इंजिन बंद करून नैसर्गिकरीत्या जहाजे प्रवाही ठेवली जातात. या क्रियेतून जहाजातील डिझेलची बचत केली जाते. पुढे हे डिझेल अशा टोळय़ांना अवैधरीत्या विकले जाते. जहाजावरील अभियंते इंधन टाकीतून किती डिझेल सोडायचे म्हणजेच चोरट्या टोळय़ांना द्यायचे यावर नियंत्रण ठेवतात. तशी तजवीज करतात. गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीनुसार आरोपी छोटूची टोळी सुमारे २० रुपये प्रतिलिटर या भावाने जहाजांवरून डिझेलचा साठा खरेदी करे.

# श्रीदेवींचा अंत्यविधी; डझनभर पाकिटमार पकडले

**मुंबई-** बॉलिवूडची लेडी सुपरस्टार, अभिनेत्री श्रीदेवींना अंतिम निरोप देण्यासाठी बुधवारी विलेपार्ले येथे अफाट जनसागर लोटला होता. देशभरातून त्यांचे हजारो चाहते अंत्ययात्रेसाठी आले होते. सेलिब्रेशन क्लब ते स्मशानभूमीपर्यंत निघालेल्या अंत्ययात्रेत काही पाकिटमारही घुसले होते. या गर्दीचा फायदा घेत काही भामट्यांनी हात साफ करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांना त्याची आधीच कुणकूण लागल्याने त्यांच्या नजरेतून हे भामटे सुटू शकले नाहीत. पोलिसांनीही सापळा रचून सुमारे डझनभर पाकिटमारांना अलगद टिपले आणि त्यांची थेट तुरुंगात रवानगी केली.

श्रीदेवींनी अकाली एक्झिट घेतल्याने बॉलिवूडसह देशभरातील त्यांच्या हजारो चाहत्यांना त्याचा मोठा धक्का बसला. त्यामुळे आपल्या लाडक्या अभिनेत्रीला अंतिम निरोप देण्यासाठी हजारो चाहते विलेपार्ले स्मशानभूमीत आले होते. श्रीदेवींच्या अंत्ययात्रेला प्रचंड गर्दी होण्याचा अंदाज असल्याने सेलिब्रेशन क्लब ते स्मशानभूमीपर्यंत ७ हजार पोलिसांचा ताफा तैनात ठेवण्यात आला होता.



त्यात १२०० महिला पोलिसांचा समावेश होता. त्याशिवाय दंगल नियंत्रण पथकाच्या ६ तुकड्या आणि एआरपीएफची एक तुकडी यावेळी तैनात करण्यात आली होती. प्रचंड गर्दी पाहून पोलिसांनी श्रीदेवींचं पार्थिव घेऊन जाणाऱ्या ट्रकच्या पुढे-मागे स्पेशल स्क्वॉडच्या सहा गाड्या लावल्या होत्या.

# वामन हरी पेठे दुकानलुटीचा कट उधळला

## दहा जणांची सशस्त्र टोळी अटकेत; मुंबई गुन्हे शाखेची कारवाई

**मुंबई - दादरच्या गोखले मार्गावरील 'वामन हरी पेठे ज्वेलर्स' हे जुने सोन्याचांदीच्या दागिन्यांचे दुकान लुटण्याचा कट मुंबई गुन्हे शाखेने बुधवारी मध्यरात्री उधळला. दुकान लुटण्यासाठी आलेल्या दहा जणांच्या टोळीला पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून हत्यारांसह दरोडय़ासाठी खास तयार करून घेतलेल्या तीन लहान पहारी, गॅस कटर, छोटे एलपीजी सिलेंडर आणि अन्य बरीच सामग्री हस्तगत करण्यात आली. यापैकी काही जणांची गुन्हेगारीची पार्श्वभूमी आहे. त्यांची कारागृहात ओळख झाली. एकत्र येऊन त्यांनी दोन महिन्यांपासून या दरोडय़ाची तयारी सुरू केली होती. तसेच नेपाळ आणि झारखंड येथून साथीदारांना बोलावून घेण्यात आले होते, अशी धक्कादायक माहिती चौकशीदरम्यान पुढे आली.**

गुन्हे शाखेचे प्रभारी निरीक्षक अशोक खोत, अजय सावंत, निरीक्षक योगेश चव्हाण आणि पथकाला वामन हरी पेठे ज्वेलर्स लुटण्याची तयारी सुरू झाल्याची कुणकूण लागली होती. आरोपींनी लुटीचा दिवस नक्की केल्याची माहिती मिळवून या पथकाने बुधवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास गोखले मार्गावर पेठे ज्वेलर्सजवळ सापळा रचला. या सापळ्यात शंकर साहूद, पवन वावजी ऊर्फ दिल बहादूर, मानबहादूर कारकी, ओम राय, सागर आहुजा, अर्जुन गोहरा, गीरी प्रेमसिंग, भक्तकरी ढोली, हुमायून शेख आणि सैबूत शेख या दहा जणांना अटक करण्यात आली. यापैकी हुमायून, सैबूत हे झारखंडचे आहेत. उर्वरित सर्व नेपाळचे रहिवासी आहेत. तसेच भक्तकरी याने यापूर्वी पेठे ज्वेलर्स दुकान असलेल्या इमारतीत काम केलेले आहे. या टोळीकडून आठ चॉपर, कुकरी, नऊ स्क्रू ड्रायव्हर, हातोडा, तीन लहान पहारी, तीन पक्कड, पाना, कटावणी, ऑक्सिजन आणि एलपीजीचे एकूण दोन गॅस सिलिंडर, गॅस कटर टॉर्च, रेग्युलेटर, दोन गॅस कटिंग नोझल, लायटर आणि अन्य



वस्तू हस्तगत करण्यात आल्या. यातील सर्वच वस्तू नव्या कोऱ्या असून अलीकडेच विकत घेतलेल्या आहेत. तसेच सर्व सामान सॅकमध्ये राहावे या पद्धतीने तयार केलेले आहे, असे गुन्हे शाखेतून सांगण्यात आले. काही महिन्यांपूर्वी भिवंडीत घडलेल्या घरफोडीत नेपाळी आरोपींना आसरा देणाऱ्या राय याने या आरोपींना तळोजा येथील आपल्या निवासस्थानी आसरा दिल्याचे चौकशीतून समोर आले.

# लोकसभेबरोबरच राज्यात विधानसभा निवडणूक

**मुंबई-** भाजपच्या धोरणानुसार पुढील वर्षी लोकसभेबरोबरच राज्य विधानसभेची एकत्रित निवडणूक होणार आहे. परिणामी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाच महिन्यांचा कालावधी कमी मिळेल. भाजपशासीत राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची परिषद बुधवारी नवी दिल्लीत पार पडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पक्षाध्यक्ष अमित शहा या वेळी उपस्थित होते. एक राष्ट्र – एक निवडणूक हे भाजपचे धोरण आहे. पुढील वर्षी लोकसभेबरोबरच महाराष्ट्र, झारखंड, हरयाणा, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आदी राज्यांच्या निवडणुका घेतल्या जातील. महाराष्ट्र विधानसभेची मुदत ऑक्टोबर २०१९ मध्ये संपत आहे. लोकसभेच्या निवडणुका नियोजित वेळेनुसार मे २०१९ मध्ये अपेक्षित आहेत. मात्र, मे महिन्यापर्यंत भाजपचे नेते थांबणार नाहीत. निवडणुका २०१९ च्या सुरुवातीलाच होण्याची शक्यता आहे. त्रिपूरा, कर्नाटक या राज्यांची सत्ता जिंकल्यास भाजपचे नेते २०१९च्या आरंभी लोकसभेच्या निवडणुकांना सामोरे जाण्याची तयारी करू शकतात. राज्य विधानसभेचा कार्यकाळ पूर्ण केला जाईल, असा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला होता. पण भाजपच्या नेतृत्वाने त्यांना लोकसभेबरोबरच



राज्य विधानसभेची निवडणूक घेण्याची सूचना केली आहे. मोदी व शहा यांच्या सूचनेनुसार राज्य विधानसभेची निवडणूक लोकसभा निवडणुकीबरोबरच होऊ शकते. १९९९ मध्ये प्रयोग फसला याआधी १९९९ मध्ये केंद्रात भाजप आणि राज्यात युतीची सत्ता असताना एकत्रित निवडणुका घेण्यात आल्या होत्या. तेव्हा केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भाजपला सत्ता मिळाली होती, पण राज्यात शिवसेना-भाजप युतीला पुन्हा सत्ता मिळाली नव्हती. तेव्हा काँग्रेस आणि राष्ट्रवादीने स्वतंत्रपणे लढूनही अधिक जागा मिळाल्या होत्या. परिणामी युतीला सत्ता गमवावी लागली होती. लोकसभा आणि विधानसभेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा नारा शिवसेनेने दिला आहे. दुसरीकडे काँग्रेस आणि राष्ट्रवादीत आघाडी करण्याची तयारी सुरू झाली आहे. अशा वेळी राज्यात भाजपपुढे मोठे आव्हान असेल. लोकसभेबरोबरच राज्यात विधानसभेची निवडणूक झाल्यास त्याचा राजकीय लाभ मिळेल, असे भाजपचे गणित आहे. लोकसभेच्या जास्तीत जास्त जागा आणि राज्याची पुन्हा सत्ता हे भाजपचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने तयारी सुरू करण्यास मुख्यमंत्र्यांना सांगण्यात आले आहे.

## पत्रकारांसाठी कामगार कायद्याखाली काम करणाऱ्या 'जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र' (जेयुएम) या पत्रकार संघटनेची (सन २०१७ ते २०१९) या कार्यकाळासाठी राज्य कार्यकारणीची निवड करण्यात आली

**कार्यकारणी खालील प्रमाणे**

**-:अध्यक्ष:-**
नारायण पांचाळ

**-:उपाध्यक्ष:-**
जयराम सावंत
डॉ, शांताराम कारंडे
दिपक नाईक

**-:सरचिटणीस:-**
हेमंत सामंत

ङचिटणीसङ -
प्रवीण दवणे
सतिश साटम

**-:खजिनदार:-**
दिलीप पटेल

**-:राज्य परिषद सदस्य:-**
/जिल्हा प्रतिनिधी
अरुण कुलकर्णी (मुंबई),
राजेंद्र जाधव
रईस अहमद
अजेयकुमार जाधव
नामदेव काशिद (मिरा रोड / ठाणे)
भीमराव धुळप
भारती बारस्कर(मुंबई)
सारिका शिंदे (कल्याण / डोंबिवली)
दत्ताराम मयेकर (भाईंदर)
धिरज सिंग (उल्हासनगर)
विजय मोरे (मिरा रोड)
अविनाश राऊत (अकोला, परभणी)
रमेश चव्हाण - पाटील (बुलढाणा)
राधेश्याम वर्मा (सोनपेठ, परभणी)
चंद्रकांत लिंगायत (रत्नागिरी)
एच बी पांचाळ (रत्नागिरी)
चंद्रकांत खुताडे (डहाणू)
अशोक खांबेकर (नाशिक)
धनंजय कुलकर्णी (बीड)
डॉ.धनाजी चव्हाण (परभणी)
असलमं पोपटे (वाशीम)
शाहजहाँन अत्तार (सोलापूर)
संतोष जाधव (बारामती)
आनंन शिंपी (जळगाव)
जगदीश कुमार (मुंबई)
मो,मुकीम शेख (मुंबई)
लालप्रताप सिंह (पालघर)
सुनील उपाध्याय(वसई विरार)
दिनेश शिंदे(ठाणे)
किरण किरतकुड़वे
विलास आयरे (जामनेर)

# संपादकीय... हाल कधी संपणार ?



संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

**मराठी माणसांच्या हक्कांसाठी म्हणून शिवसेनेची स्थापना करण्यात आली त्याला ५२ वर्षे झाली. यातील निम्म्याहून अधिक काळ मुंबई महापालिकेमध्ये शिवसेनेची सत्ता आहे. एक वर्षापूर्वी झालेल्या निवडणुकीत सत्ता टिकवण्यासाठी शिवसेनेला घनघोर संघर्ष करावा लागला. गुणवत्ता यादीत येण्याच्या बढाया मारणाऱ्या विद्यार्थ्याने काठावर उत्तीर्ण व्हावे तसे झाले आणि शिवसेना कशीतरी रडतखडत सत्तेपर्यंत पोहोचली. राज्याच्या सत्तेत मोठ्या भावाची भूमिका बजावत असलेल्या आणि मुंबईतील अमराठी मतदारांवर मोहिनी घातलेल्या भारतीय जनता पक्षाने शिवसेनेच्या नाकी नऊ आणले. सत्तेवर असताना मुंबईच्या बकालीकरणाला चालना देणाऱ्या पक्षाला खरेतर एरव्ही मतदारांनी सत्तेतून हाकलून लावले असते. परंतु कामापेक्षाही भावनिक आवाहनांवर चालणाऱ्या शिवसेनेला मराठी मतदारांनी हात दिला. केंद्रातील आणि राज्यातील सत्तेच्या विरोधातील जनमताचा शिवसेनेला फायदा झाला. गुजरातीभाषक मतदारांनी भाजपला भरभरून साथ दिली तरी मराठी मतदारांचे पारडे जड राहिले आणि शिवसेनेला सत्ता मिळाली. एरव्ही सत्तेच्या नावावर गमजा मारणे समजू शकते, परंतु संघर्षातून सत्ता मिळाल्यानंतरही डोळे उघडले नसतील तर भविष्यात मतदार जोखीम स्वीकारून वेगळा निर्णय घेऊ शकतील. महापालिकेत पुन्हा सत्ता मिळाल्यानंतर एक वर्षाच्या कारभाराचे मूल्यमापन करताना सगळ्याच आघाडीवरची दयनीय परिस्थिती समोर आली आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या धोरणांविरोधात सतत आवाज उठवून राष्ट्रीय पातळीवर चर्चेत राहता येते, स्वतःचा दखलपात्र सहभाग असलेल्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाविरोधात आवाज उठवल्यामुळे आपण लोकांसोबत असल्याचे चित्र निर्माण करता येते. केवळ आवाज काढत राहिल्यामुळे चर्चेत राहता येईल, परंतु पुढच्या निवडणुकीत मतदार या आवाजाला प्रतिसाद देणार नाहीत, हे लक्षात घ्यायला हवे. मुंबईकरांच्या रोजच्या जगण्याशी संबंधित अनेक विषय आहेत आणि त्यासंदर्भात महापालिकेतील सत्ताधारी आपली जबाबदारी पार पाडत नाहीत. केंद्राच्या आणि राज्याच्या सत्तेत सहभागी असूनही त्यासंदर्भातील जबाबदारी टाळता येऊ शकेल, परंतु मुंबई महापालिकेच्या कारभाराची जबाबदारी टाळता येणार नाही. आजवर ही जबाबदारी सांभाळताना कमालीची बेफिकिरी दाखवण्यात आली. सामान्य मुंबईकरांपेक्षा कंत्राटदारांना केंद्रस्थानी मानून कारभार केला गेला. मुंबईकरांनी सातत्याने शिवसेनेवर विश्वास दाखवला असताना रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षणाचे प्रश्न मात्र कायम आहेत. किंबहुना परिस्थिती दिवसेंदिवस अधिक बिकट बनत चालली आहे. रस्त्यांसाठी दरवर्षी खर्च होणारे कोट्यवधी रुपये कुठे जातात, या प्रश्नाचे कोडे मुंबईकरांना उलगडत नाही. कारण खड्डेयुक्त रस्ते हे मुंबईचे वैशिष्ट्य बारा महिने टिकून असते. आरोग्य यंत्रणेत सुधारणेसाठी प्रयत्न केले असते तरी मुंबईकरांनी धन्यवाद दिले असते, परंतु तेथील स्थितीही चिंताजनक आहे आणि वर यंदाच्या अर्थसंकल्पात आरोग्यसेवेचे शुल्क वाढवण्यात आले. नेतृत्व हुशार असेल तर सत्तेतून स्वार्थ साधण्यासाठी धडपडत असते, परंतु शिवसेनेच्याबाबतीत तसेही घडताना दिसत नाही. मुंबईतील मराठी माणूस टिकला तर शिवसेनेसाठी फायद्याचे होईल आणि मराठी शाळा टिकल्या तर मुंबईतला मराठी टक्का आणि मराठीपण टिकून राहील. परंतु एखाद्या साथीच्या रोगामध्ये माणसे पटापट मरावीत, तशाप्रकारे मुंबईतील मराठी शाळा धारातीर्थी पडताना दिसत आहेत. महापालिकेतील सत्ताधारी घटकांची धडपड मात्र शाळेतील मुलांना वाटप करावयाच्या वस्तूंमध्ये टक्केवारी मिळवण्यासाठी सुरू असलेली दिसते. पावसाळ्यात तुंबणारे पाणी ही मुंबईतली कायमस्वरूपी समस्या बनली आहे. त्यावर त्यावर उपाययोजना करण्यासाठी गेल्या दहा वर्षापासून सुरू असलेला ब्रिमस्टोवॅड प्रकल्प अद्याप पूर्णत्वास गेलेला नाही. पाणी तुंबते त्यावर उपाययोजना करण्याऐवजी देशातील अन्य शहरांत पाऊस पडून तेथे पाणी तुंबण्याची वाट पाहिली जाते आणि तिकडे बोट दाखवून स्वतःच्या नाकर्तेपणावर पांघरून घालण्याचा प्रयत्न केला जातो. मुंबईचे शांघाय करण्याच्या गप्पा मारल्या जातात, परंतु केंद्र आणि राज्यसरकारही मुंबईकडे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी म्हणून पाहतात. स्थानिक स्वराज्य संस्थेतील नाकर्त्या सत्ताधाऱ्यांमुळे परिस्थितीत आणखी बिकट बनत जाते. सध्या राज्याच्या सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाने दोन दशके शिवसेनेसोबत सत्तेत राहून लुटीत भागीदारी केली. बळ वाढल्यावर वेगळी वाट धरली. सत्तेपर्यंत पोहोचता आले नाही, तेव्हा पहारेकरी बनण्याची घोषणा केली. परंतु ज्याप्रमाणे देशाचे पहारेकरी झोपा काढत आहेत, त्याचप्रमाणे इथले पहारेकरीही झोपा काढत आहेत आणि सामान्य मुंबईकरांचे मात्र हाल कधी संपेल याची वाट पाहात आहेत.**

# कर्ते आणि सवरते



तीर्थरूप देशाचे अर्थमंत्री असल्यावर चिरंजीवांच्या वर्तनात जे तारतम्य असावयास हवे होते त्याचा निश्चितच अभाव कार्ती चिदम्बरम यांच्या वर्तनात होता. विशेषतः भांडवली बाजारात कार्ती यांचा एकेकाळी असलेला दबदबा. तीर्थरूप देशाचे अर्थमंत्री नसते तर तो निर्माण झाला असता का, हा प्रश्न आहे आणि कार्ती यांच्या अटकेच्या निमित्ताने तो आज विचारणे समयोचित ठरते. तथापि कार्ती यांचे वर्तन वा कृती ही भ्रष्टाचाराच्या आरोपांस ओढवून घेणारी होती किंवा काय याचा निर्णय न्यायालयातच होईल. परंतु आपल्याकडे त्याआधी राजकीय न्यायालयांची प्रथा आहे. या न्यायालयांत आरोप केले जातात पण ते सिद्ध करावे लागत नाहीत. कार्ती यांचे वडील पी चिदम्बरम हे विद्यमान सरकारचे आघाडीचे टीकाकार आहेत. त्यामुळे कार्ती यांच्यावरील कारवाईस वृत्त आणि राजकीय असे दुहेरी मूल्य आहे. आपल्या देशवासीयांची मानसिकताही अशी की सातत्याने आरोप होत राहिले तर एका वर्गास ते खरे वाटू लागतात. मग भले न्यायालयात त्यांचा सोक्षमोक्ष लागो अथवा न लागो. तेव्हा कार्ती यांच्यासंदर्भात या राजकीय न्यायालयास फार संधी न देता त्यांना थेट अटक करून सरकारने हे प्रकरण न्यायप्रविष्ट व्हावे यासाठी पहिले पाऊल उचलले ते बरे झाले. तेथे तरी निदान या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागावा. याचे कारण हे आर्थिक गुन्हे ही आपल्या देशाची बारमाही डोकेदुखी आहे. विशेषतः पंजाब नॅशनल बँकेचा अलीकडेच समोर आलेला महाघोटाळा आणि त्यापाठोपाठ अन्य बँकांतही तसेच काही होत असल्याची शंका. यामुळे सनदी लेखापालांसाठी एक नवी नियामक यंत्रणा स्थापन करण्याचा इरादा सरकारने व्यक्त केला त्याबाबत साधकबाधक चर्चा आवश्यक ठरते.

याचे कारण जगातील सर्व मोठे घोटाळे हे लेखापालन यंत्रणांच्या दुर्लक्षामुळेच झाले आहेत. मग तो एन्रॉनचा घोटाळा असो, सत्यमचा असो किंवा हर्षद मेहता ते संजय अगरवाल ते नीरव मोदी असा कोणाचाही असो. लेखापालांनी काणाडोळा केल्यामुळे हे सर्व घोटाळे घडले. तटस्थ लेखापालांनी जे प्रश्न विचारावयास हवेत वा ज्या ताळेबंदाच्या आधारावर चिकित्सा करावयास हवी ती न झाल्यामुळेच हे सर्व घोटाळे घडले. हे जाणूनबुजून घडले असेल वा चुकीने. अर्थात यातील दुसरी शक्यता अगदीच दुर्मीळ. म्हणजे राहता राहिला लेखापालांचा मुद्दा. भ्रष्टाचार करू पाहणाऱ्यांशीच या लेखापालांचे साटेलोटे असणे हे काही नवीन नाही. यातून आर्थर ॲण्डरसनसारख्या जगातील बलाढ्य अशा लेखापाल कंपनीवर गाशा गुंडाळण्याची वेळ आली. त्यानंतरही जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त ठरलेल्या अनेक लेखापाल कंपन्या वेगवेगळ्या वादंगात अडकलेल्या आढळल्या. ज्याचा हिशेब तपासायचा त्याच्याशीच हातमिळवणी केली तर हे असेच होणार. हे म्हणजे परीक्षार्थी आणि तपासनीस यांचे साटेलोटे असल्यासारखेच. या अशा संबंधांमुळेच पंजाब बँक घोटाळादेखील पाच-सात वर्षे बिनबोभाट सुरू राहिला. बँकेच्या अधिकाऱ्यांनी साथ दिली असती तर आणखी काही वर्षेही तो तसाच सुरू राहिला असता. तेव्हा अशा वेळी या लेखापालांवरील नियंत्रणासाठी काही पावले उचलणे सरकारला अत्यावश्यक वाटले असेल तर ते समर्थनीय ठरते. केंद्र सरकारचा तोच प्रयत्न असून या संदर्भातील निर्णय लवकरच अपेक्षित आहे. तो म्हणजे नॅशनल फायनान्शियल रिपोर्टिंग ॲथॉरिटी या नव्या यंत्रणेचा जन्म. ही यंत्रणा सर्व सनदी लेखापालांवरील नियंत्रणासाठी स्थापन करण्याचा घाट घातला जात आहे. सध्या ही जबाबदारी सनदी लेखापालांच्या राष्ट्रीय संस्थेकडे आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडिया, ही देशातील सर्व सनदी लेखापालांचे, म्हणजे चार्टर्ड अकौंटंट्स, सीए, नियंत्रण करणारी यंत्रणा. या पदवीसाठीच्या परीक्षा याच संघटनेतर्फे घेतल्या जातात आणि उत्तीर्णांच्या दर्जाबाबतचे नियमही हीच संघटना तयार करते. ही संघटना पूर्णपणे सरकारमान्य असून तीवर आठ संचालक हे केंद्र सरकारतर्फे नियुक्त केले जातात. तसेच या संघटनेतर्फे नियमन, शोधन आदी कामांसाठी ज्या समित्या नेमल्या जातात त्यावरही केंद्र सरकारचे प्रतिनिधी असणे बंधनकारक असते. सनदी लेखापालांच्या शिस्तभंगाच्या वा गरव्यवहारांच्या चौकशीसाठी नेमावयाच्या समित्यांचे प्रमुख हे निवृत्त उच्च न्यायाधीशच असणे गरजेचे असते. तसा नियमच असून या न्यायाधीशाची नियुक्ती ही केंद्र सरकारकडून केली जाते. याचा अर्थ असा की या संघटनेवर सरकारचे पूर्ण नियंत्रण असून ती चालवणारे व्यावसायिक हे सरकारचे नियंत्रित असतात. आणि तरीही या सनदी लेखापालांच्या नियमनासाठी आणखी एका यंत्रणेची गरज सरकारला वाटते.

याचे कारण आपण हे प्रारूप परदेशीयांकडून आयात करू पाहतो. अमेरिका वा युरोपात लेखापालनाची परीक्षा घेणाऱ्या आणि त्यांचे नियमन/ नियंत्रण करणाऱ्या यंत्रणा पूर्णपणे स्वतंत्र असतात. त्याचमुळे भारतातही त्याच धर्तीवर यंत्रणा विकसित करण्याचे प्रयत्न गेली काही वर्षे सुरू आहेत. या संदर्भात सरकारी समित्यांनी तशा सूचनाही केल्या होत्या. अलीकडेच अर्थमंत्री अरुण जेटली यांनी बँक घोटाळ्यांची जबाबदारी सल नियामकांवर ढकलली. त्यांच्या दर्जावृद्धीसाठी पावले उचलण्याची गरज त्याचमुळे पुन्हा एकदा समोर आली. परंतु असे काही करण्यास लेखापालांच्या संघटनेचा, आयसीएआय, ठाम विरोध आहे. लेखापालांच्या संघटनेचे म्हणणे असे की आताच्या व्यवस्थेवरही सरकारचेच नियंत्रण आहे. या यंत्रणेवर सरकारी प्रतिनिधी असतात आणि चौकशी आदी कामेही सरकार सांगेल त्या अधिकाऱ्यांकडूनच करून घेतली जातात. त्यामुळे आणखी एक संघटना स्थापून साधणार काय, असा लेखापालांच्या संघटनेचा प्रश्न असून सरकारला त्याचे उत्तर देण्यात स्वारस्य नाही. आणखी एक संघटना नेमली गेली तर काही कारण नसताना आहे त्या संघटनेचे अधिकार पातळ होतील आणि नव्या संघटनेकडेही ते पूर्णपणे वर्ग होणार नाहीत. अशा वेळी अशा दोन संघटना असण्याच्या फायद्यापेक्षा तोटाच अधिक आहे, असे विद्यमान संघटनेचे म्हणणे. ते सरकारच्या कानावर घालण्यात आले असून सरकारचा कल पाहता त्याचा काही उपयोग होईल असे काही दिसत नाही.

अशा वेळी या नव्या यंत्रणेच्या उपयुक्तता आणि परिणामकारकतेविषयी प्रश्न निर्माण होतात. आताही विविध यंत्रणांकडून सरकारी आस्थापनांच्या कारभारावर लक्ष ठेवले जाते आणि नियमित त्याची छाननी केली जाते. देशाचे महालेखापाल, केंद्रीय दक्षता आयोग, सक्तवसुली संचालनालय, आयकर, जकात अशांपासून ते केंद्रीय गुप्तचर यंत्रणेपर्यंत अनेक यंत्रणा बँका, सरकारी विमा कंपन्या आदींवर लक्ष ठेवून असतात. त्या खेरीज बँकांचे म्हणून नेमले गेलेले खासगी लेखापालदेखील आहेतच. याचा अर्थ लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणांची कमतरता हे काही या गरव्यवहारांमागचे खरे कारण नाही. खरे कारण हे या विद्यमान यंत्रणांची परिणामकारकता आणि त्यांना असलेले स्वातंत्र्य यांच्याशी निगडित आहे. या यंत्रणा स्वायत्त आहेत. पण कागदोपत्री. बऱ्याचदा या यंत्रणांचा उपयोग सत्ताधाऱ्यांकडून आपल्या विरोधकांना नामोहरम करण्यासाठीच केला जातो. यामुळे या यंत्रणांचे राजकीयीकरण झाले असून त्या फक्त सत्ताधाऱ्यांनाच जबाबदार असतात. तसे न करता त्यांना संसदेस उत्तरदायी केले गेले तरी या यंत्रणांच्या परिणामकारकतेत निश्चितच मोठा बदल होईल. भ्रष्टाचार 'कर्ते' आहेत त्यांच्यावर सरकारने कारवाई करावीच पण आसपास हे जे 'सवरते' आहेत त्यांनाही गरव्यवहारांसाठी जबाबदार धरले जावे. नव्या यंत्रणेच्या स्थापनेपेक्षा असे करणे भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी अधिक परिणामकारक ठरेल.

# भाजपाच्या नाकावर टिच्चून सेनेने केले 'स्मार्ट मीटर' मंजूर



**ठाणे :** स्मार्ट मीटरच्या मुद्यावरून बुधवारी झालेल्या महासभेत पुन्हा सत्ताधारी शिवसेना आणि भाजपामध्ये संघर्ष पाहायला मिळाला. स्मार्ट मीटरची योजना इतर महापालिकांत अपयशी असताना ती ठाण्यात राबवण्यास भाजपा नगरसेवकांनी आक्षेप नोंदवला. तरीही भाजपाच्या नाकावर टिच्चून शिवसेनेने राष्ट्रवादीच्या मदतीने प्रस्तावाला पाठिंबा मिळवून तो बहुमताने मंजूर केला. ही योजना सर्वसामान्य ठाणेकरांसाठी उपयुक्त असून हे मीटर बसवल्यानंतर ३७ टक्के पाणीगळती पाच टक्क्यांवर येणार आहे. असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला.

११ वर्षांपासून नळजोडण्यांवर स्मार्ट मीटर बसवण्याची केवळ घोषणा करत असलेल्या महापालिकेने अखेर ते बसवण्याचा निर्णय पुन्हा घेतला असून, स्मार्ट सिटी मिशनअंतर्गत आलेला निधी त्यावर खर्च केला जाणार आहे. मीटर खरेदीपासून ते बसवण्यापर्यंतचा सर्व खर्च हा त्यातून केला जाणार आहे. त्यामुळे यापूर्वी याचा खर्च ठाणेकरांकडून घेण्याचा निर्णय आता रद्द झाला आहे.

यासंदर्भातील प्रस्ताव बुधवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी पटलावर आला असता त्यावर भाजपाचे नगरसेवक कृष्णा पाटील यांनी शंका उपस्थित केल्या. मुंबई, नवी मुंबई तसेच इतर महापालिकांत हा प्रयोग अपयशी ठरला असताना ठाण्यात ही योजना का राबवली जात आहे, असा मुद्दा उपस्थित करून आधी प्रायोगिक तत्त्वावर ती राबवून त्यानंतर शहरात सर्व ठिकाणी ती अमलात आणावी, अशी मागणी त्यांनी केली. मात्र, सभागृह नेते नरेश म्हस्के, नगरसेवक विकास रेपाळे तसेच परिषा सरनाईक यांनी स्मार्ट मीटर बसवण्याच्या बाजूने मत व्यक्त केले. या योजनेमध्ये काळेबेरे असेल, तर प्रशासनाने किंवा कृष्णा पाटील यांनी खुलासा करावा, अशी मागणी म्हस्के तसेच विरोधी पक्षनेते मिलिंद पाटील यांनी केली. अखेर, अतिरिक्त आयुक्त समीर उन्हाळे यांनी आक्र मक भूमिका घेऊन गळती कमी होईल, असे स्पष्ट केले. मिलिंद पाटील यांनी हा ठराव मांडला व नरेश म्हस्के यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिले.

# पीएफ कार्यालयाची ६.५० लाखांची फसवणूक




**ठाणे :** कामगारांचे पैसे त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यातून भलत्याच व्यक्तीच्या खात्यामध्ये जमा करणा-या भिवंडीच्या माजी नगरसेविका दीपाली भोई यांच्यासह तिघांविरुद्ध वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये ३० ते ३५ कामगारांची सहा लाख ४७ हजार ५५२ रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मुरबाड एमआयडीसीतील विद्यावासिनी स्टील प्रॉडक्ट्स प्रा. लिमिटेड आणि पालघरच्या वाडा तालुक्यातील कुडूस येथील मेसर्स कुडूस स्टील रोलिंग मिल्स प्रायव्हेट या दोन कंपन्यांमधील मूळ भविष्य निर्वाह निधी सदस्यांची ठाण्याच्या भविष्य निर्वाह निधी कार्यालयात जमा झालेली सहा लाख ४७ हजार ५५२ इतकी रक्कम प्राधिकृत अधिकारी आणि इतर बँक खातेधारक यांनी आपसात संगनमत करून ती अन्य बँक खात्यात वळती केल्याचा आरोप आहे. प्राधिकृत अधिकारी फिरोज सिद्दीकी (रा. राबोडी, ठाणे), भिवंडी-निजामपुरा महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका भोई आणि स्टील रोलिंग मिल्स कंपनीचे गंगाराम अग्रवाल यांना या कामगारांची बँक खाती तसेच इतर माहिती होती. त्यांच्याच माहितीने हे पैसे वळते झाले असल्यामुळे प्रथमदर्शनी त्यांच्याविरुद्ध हा गुन्हा दाखल झाल्याची माहिती वागळे इस्टेट पोलिसांनी दिली. २००९ ते २०१६ या काळात सुमारे साडेसहा लाखांची रक्कम अन्य व्यक्तीच्या बँक खात्यात वळती झाली आहे.

# ठाण्यात ११ मार्चपासून भव्य कृषि महोत्सव

## विविध कार्यक्रमांची रेलचेल

**ठाणे :** कृषि विभागातर्फे जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत कृषि तंत्रज्ञान तसेच योजनांची माहिती पोहचविण्यासाठी जिल्हा कृषि महोत्सव २०१८ चे ११ ते १५ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. ठाण्यातील उन्नती गार्डन येथील मैदानावर या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दुपारी १.०० वाजता होणार असून या महोत्सवाच्या काळात शेती आणि शेतीवर आधारित विविध उद्योगांतील १२० स्टॉल्स असणार आहेत अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांनी दिली आहे.

विशेष म्हणजे या महोत्सवास ठाणे व परिसरातील मान्यवर, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक बांधिलकीने काम करणारे कलाकार देखील भेट देणार आहेत. स्टॉल बुकिंगसाठी आत्मा च्या कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कृषि महोत्सवाच्या काळात विविध परिसंवाद व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात प्रथमच होणाऱ्या अशा भव्य स्वरुपाच्या कृषि महोत्सवात शेतीतील विविध प्रकारचे एकुण १२० स्टॉल असतील. या महोत्सवात शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद, खरेदीदार विक्रेता सम्मेलन तसेच विविध विषयावर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

**विविध व्याख्याने आणि परिसंवाद**


या परिसंवादामध्ये दिनांक ११ मार्च रोजी प्राईम मूव्ह सेवापूरवठादार संस्था पुणे यांच्यावतीने अंकुश पडवळे, शिरीष तेरखडकर, यांचे व्याख्यान होईल. १२ मार्च ला प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत चे एल एच चव्हाण, कृषी विज्ञान केंद्र कोसबाडचे उत्तम सहाणे, कृषी संशोधन केंद्र पालघरचे डॉ गभाले, यांच्या उपस्थितीत शेतकरी-शास्त्रज्ञ असा सुसंवाद होईल. यावेळी रत्नागिरी पणन मंडळाचे उप सरव्यवस्थापक भास्कर पाटील, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे डॉ एम बी दळवी, कृषी भूषण शेतकरी शेखर भडसावळे, यांचे देखील मार्गदर्शन होईल.

१३ मार्च रोजी शेतकरी उत्पादक कान्पानिच्व्हे प्रतिनिधी खरेदीदार व निर्यातदार यांचे संमेलन होईल. त्याचप्रमाने तळेगाव दाभाडे चे एच टी सी कंपनीचे सहायक व्यवस्थापक संजय पारडे, व्यवस्थापक रवींद्र देशमुख, शहापूर चे प्रगतीशील शेतकरी मकरंद चुरी, कृषी भूषण शेतकरी राजेंद्र भट्ट, कृषी विकास अधिकारी डॉ प्रफुल्ल बनसोडे, उपविभागीय कृषी अधिकारी जाभूवंत घोडके यांचे व्याख्यान होईल.

१४ मार्च रोजी पुण्याचे निर्यातदार तज्ज्ञ तुषार खारकर, एनएचआरडीएफ शास्त्रज्ञ तुषार आमरे, के के वाघ कृषी महाविद्यालय, नाशिकचे सहाय्यक प्राध्यापक ,कीटकशास्त्र तुषार उगले कृषी सल्लागार अनंत बनसोडे, मृद विश्लेषण व मृदचाचणी अधिकारी डीएस घोलप यांचे व्याख्यान होईल.

१५ मार्च रोजी प्राईम मुव्हचे जिल्हा समन्वयक श्री सुकळीकर, सेंद्रिय शेती तज्ज्ञ मनोहर शेते यांचे मार्गदर्शन होईल. दुपारी ३ वाजता कृषी महोत्सवाचा समारोप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.


# ठाणे-बेलापूरवरील कोंडी सुटणार?



**नवी मुंबई -** ठाणे-बेलापूर मार्गावरील वाहतूककोंडी फोडण्यासाठी सर्वात मोठी उपाययोजना ठरणाऱ्या रबाळे ते घणसोली या एक हजार ४०० मीटरच्या उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असून तो गुढीपाडव्यापर्यंत वाहतुकीस खुला करण्याचा एमएमआरडीएचा प्रयत्न आहे. या पुलाच्या दोन्ही बाजूंच्या उतारावरील ४०० मीटर भागाचे आणि पुलाचे अस्फाल्टिंग, रंगरंगोटी, दोन तुळया जोडणे, कठडे बांधणे यांसारखी जुजबी कामे शिल्लक आहेत, मात्र येत्या महिनाभरात हे काम पूर्ण होण्याची शक्यता एमएमआरडीएने वर्तविली आहे. या कामासाठी २४ महिन्यांची मुदत देण्यात आली होती. ती १८ मार्चला संपत आहे.

ठाणे-बेलापूरवरील वाहतूककोंडी कमालीची वाढली आहे. तुर्भेपर्यंत वाहतूककोंडीची बेटे तयार झाली आहेत. घणसोली, तळवली आणि गोठवली गावाकडे जाणारे रस्ते हे या मार्गावरच येऊन मिळत असल्याने कोंडीत भर पडत आहे. यावर उपाय म्हणून नवी मुंबई महापालिकेने रबाळे रेल्वे स्थानक ते घणसोली रेल्वे स्थानकापर्यंत एक उड्डाणपुलाचा प्रस्ताव पाच वर्षांपूर्वी तयार केला होता. पूल एमएमआरडीएने बांधावा म्हणून तात्कालीन पालकमंत्री गणेश नाईक यांनी आग्रह धरला. त्यामुळे एमएमआरडीएने दीडशे कोटी रुपये खर्च करून हा पूल आणि सविता केमिकल्सजवळ आणखी एक उड्डाणपूल बांधून देण्याची तयारी दर्शवली आहे. त्याशिवाय महापे एमआयडीसीतून कोपरखैरणेत जाण्यासाठी एक भुयारी मार्गदेखील बांधला जाणार आहे. त्यापैकी रबाळे ते घणसोली उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. वाहतुकीला अडथळा निर्माण न करता १,४०० मीटर लांबीचा उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. सध्या या पुलाच्या दोन्ही बाजूंना उतार बनविण्याचे काम सुरू आहे. उर्वरित कामे येत्या महिन्यात पूर्ण होऊ शकतील, असे एमएमआरडीएच्या सूत्रांनी सांगितले. या भागात होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या पुलाचा फार मोठा उपयोग होणार असून महापे एमआयडीसीत जाणारी वाहने रबाळे येथे पुलावर चढल्यानंतर थेट घणसोली, गोठवली, तळवली या गावांतील अंतर्गत वाहतुकीला अडथळा निर्माण न करता घणसोली उड्डाणपुलावर जाणार आहेत. त्यामुळे हा उड्डाणपूल खुला होण्याची वाहनचालक अतुरतेने वाट पाहत आहेत.

# बोगस कॉल सेंटर प्रकरण : आरोपींनी बनविले बँकेचे बनावट धनादेश




**ठाणे :** ठाणे पोलिसांनी उघडकीस आणलेल्या बोगस कॉल सेंटर प्रकरणातील आरोपींनी चक्क अमेरिकन बँकेचे बनावट धनादेश तयार केल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. या आरोपींचे अमेरिकेत काही साथीदार असून, तेदेखील या गुन्ह्यात सहभागी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

घोडबंदर रोडवरील आनंदनगरातील उन्नती वूड्स सोसायटीमध्ये सुरू असलेल्या बोगस कॉल सेंटरवर कासारवडवली पोलिसांनी सोमवारी मध्यरात्री धाड टाकली. गुजरातमधील बडोदा येथील राकेश अनिल कोंडवाणी आणि राजस्थानमधील बिलियावास येथील जोरावत शेरसिंग राजपूत यांना पोलिसांनी अटक केली. व्हीओआयपी कॉलद्वारे हे आरोपी अमेरिकन नागरिकांशी संपर्क साधून त्यांना कर्जाचे आमिष दाखवायचे. त्यानंतर प्रक्रिया शुल्काच्या नावाखाली त्यांची फसवणूक करायचे.

# सत्तेच्या भांगेने भाजपाचे डोके बधिर झाले

**आमदार प्रशांत परिचारक यांचे निलंबन मागे घ्यावे म्हणून ज्यांनी ठराव मांडला आणि पाठिंबा दिला त्यांना शिवरायांचे नाव घेण्याचा अधिकार नाही. ते सगळे 'छिंदम उत्सव' मंडळाचे मानकरी आहेत अशी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. सामना या शिवसेनेच्या मुखपत्रातून ही टीका करण्यात आली आहे. सीमेवरच्या जवानांचा अपमान म्हणजे शिवरायांचाच अपमान आहे. मात्र सत्तेच्या भांगेने भाजपाचे डोके बधिर झाले आहे असे या अग्रलेखात म्हटले आहे.**



'जय जवान जय किसान' या घोषणचे भाजपाच्या राज्यात मातेरे होईल असे वाटले नव्हते. मात्र दुर्दैवाने ते झाले आहे. राष्ट्रभक्तीच्या घोषणांचा फुगा रोज फुटतो आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा तर चिंतेचा विषय आहे. अभिनेत्री श्रीदेवी यांच्याप्रमाणे शेतकऱ्यांनाही शासकीय इतमामात मानवंदना द्यायची म्हटले तर महाराष्ट्र सरकारच्या बंदुकांमधील काडतुसे संपून जातील. जय जवान या आपल्या प्रिय घोषणेचे बारा वाजवून प्रशांत परिचारक यांना भाजपा सरकारने विधीमंडळात पायघड्याच घातल्या आहेत. प्रशांत परिचारक यांचे निलंबन रद्द करण्याचा ठराव ज्यांनी मंजूर केला आणि ज्यांनी या ठरावाला मूक संमती दिली ते सगळेजण नगरच्या 'छिंदम' अवलादीचेच म्हणावे लागतील.

कदाचित सन्मानीय सदस्यांना हा शब्दप्रयोग आवडणार नाही पण आम्ही विधीमंडळाची माफी मागून हा शब्दप्रयोग करतो आहोत. कारण ज्यावेळी प्रशांत परिचारक यांच्याविरोधात निंदाजनक ठराव आला होता त्यावेळी त्याला सर्वांनी एकमुखी पाठिंबा दिला होता. परिचारक हे विधान परिषदेचे सदस्य आहेत आणि भाजपाचे आहेत. त्यांनी भारतीय सीमेवर जीवाची बाजी लावणाऱ्या जवानांबाबत आक्षेपार्ह आणि मानहानीकारक वक्तव्य केले होते. त्यामुळे त्यांचे निलंबन करण्यात आले होते. सैनिक वर्षभर सीमेवर असतात आणि इकडे गावात त्यांच्या बायका बाळंत होतात. असे परिचारक म्हटले होते. देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या जवानांचा एवढा भयंकर शब्दात अपमान आत्तापर्यंत कोणीही केला नसेल. असा आमदाराचे निलंबन झाले. मात्र आता पुन्हा त्यांच्यासाठी पायघड्या घालण्यात आल्या आहेत.


आजही महाराष्ट्राचे मावळे जय भवानी, जय शिवाजी आणि हरहर महादेवचा नारा देत सीमेवर शत्रूशी दोन हात करतात. प्राणांची आहुती देतात. त्यांच्याबाबत असभ्य बोलणे म्हणजे शिवरायांचा अपमानच आहे. पण भाजपाचे डोके सत्तेच्या भांगेने बधिर झाले आहे. त्यांना फक्त विधानसभा विजयासाठीची गणिते दिसत आहेत. परिचारक यांचे निलंबन काय ठेवले असते किंवा छिंदमप्रमाणे त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला असता तर आभाळ कोसळले असते का? म्हणूनच ज्यांनी परिचारक यांचे निलंबन मागे घेण्याचा ठराव मांडला आणि ज्यांनी पाठिंबा दिला त्यांना शिवरायांचे नाव घेण्याचा अधिकार नाही.

अशा शब्दात भाजपावर अग्रलेखातून ताशेरे झाडण्यात आले आहेत. सत्तेवर आल्यापासून या दोन्ही पक्षांमध्ये शाब्दिक चकमकी आणि वाद होताना दिसत आहेत. सत्तेवरच्या दोन्ही पक्षांनी भांडत राहायचे आणि विरोधकांचीही स्पेस मिळवायची असे हे धोरण वाटले होते. मात्र चार वर्षात या दोन्ही पक्षातून विस्तव जात नसल्याचेच चित्र आहे. म्हणूनच एकमेकांवर कुरघोडी करण्याची एकही संधी हे दोन्ही पक्ष सोडताना दिसत नाहीत.

# नीरव मोदीप्रकरणी अमेरिकेचा सहकार्यास नकार

**वॉशिंग्टन:** पंजाब नॅशनल बँकेत महाघोटाळा करणारा हिरे व्यापारी नीरव मोदी अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरात लपला असला तरी अमेरिकेने मात्र या प्रकरणात भारताला सहकार्य करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. 'नीरव मोदी अमेरिकेत लपल्याचं आम्हीही मीडियातूनच ऐकलं आहे. मात्र त्याबाबत आम्ही अधिकृत दुजोरा देऊ शकत नाही,' असं म्हणत अमेरिकेने हातवर केले आहेत.

अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने हे स्पष्टीकरण दिलं. अमेरिकेत लपून बसलेल्या नीरव मोदीला शोधून काढण्यासाठी अमेरिकेचं परराष्ट्र मंत्रालय भारताला मदत करणार आहे का? असा सवाल अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याला विचारण्यात आला. तेव्हा त्यांनी हे उत्तर दिलं. 'मात्र मोदीला पकडायचेच असेल आणि त्यासाठी कायदेशीर सल्ला हवा असेल तर भारताने अमेरिकेच्या विधी विभागाशी संपर्क साधावा,' असा सल्लाही या प्रवक्त्याने दिला. तर अमेरिकेच्या विधी विभागाने मोदीप्रकरणावर बोलण्यास नकार दिला.



मोदीने पंजाब नॅशनल बँकेत १२,००० कोटीचा घोटाळा करून अमेरिकेत पलायन केले आहे. याच घोटाळ्यातील आरोपी आणि त्याचा मामा मेहुल चोक्सीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

# छत्तीसगढच्या सीमेवर सुरक्षा दलाची मोठी कारवाई

# १२ माओवादी ठार

**छत्तीसगड : छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांचा एका कॅम्पवर कारवाई करून तेलंगणा पोलिसांनी १२ नक्षलवाद्यांचा खात्मा केला. यात सहा महिलांचाही समावेश असून कारवाईत एक जवान शहीद झाला आहे. चकमकीत माओवादी नेता हरिभूषणही ठार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. तेलंगणा पोलिसांच्या ग्रेहाऊंड या विशेष दलाने ही कारवाई केली.**

गुप्तचर यंत्रणेने दिलेल्या माहितीवरून ग्रेहाऊंड दलाने छत्तीसगडमध्ये ३५ किलोमीटर आत जाऊन नक्षलवाद्यांचा कॅम्प उद्ध्वस्त केला. त्या ठिकाणाहून एके-४७ रायफल्स जप्त करण्यात आल्या आहेत. माओवाद्यांना वरिष्ठ



नेत्यांना एके-४७ रायफल्स दिल्या जातात. या ठिकाणाहून १० नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत. सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास या कारवाईला प्रारंभ झाला. या चकमकीत ग्रेहाऊंड दलाचा सुशीलकुमार नावाचा ज्युनिअर कमांडर शहीद झाला.

ग्रेहाऊंड हे नक्षलवादविरोधी पथक असून तेलंगणा आणि आंध्र प्रदेशने संयुक्तपणे तयार केले आहे. छत्तीसगड पोलिसांच्या मदतीने त्यांनी ही कारवाई केली. पामेट पोलिस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या पुजारी कानकेर जंगलात नक्षलवाद्यांचे शिबिर सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

दंतेवाडा या ठिकाणी पोलिस आणि माओवाद्यांच्या चकमकीत तीन पोलिस जखमी झाले होते. त्यामुळे माओवादविरोधी पथकाला मिळालेले हे मोठे यश मानले जाते आहे.

# होळीचे रंग विदेशी पाहुण्यांच्या संग

## पोलीस बातमी पत्रचे पत्रकार यांनी विदेश पाहुण्यांसोबत साजरी केली रंगपंचमी





पोलिस बातमी पत्रचे पत्रकार श्री. मंगेश अभंग यांनी मुंबई मलबार हिल येथे विदेशी पाहूण्यांना हिंदूच्या सणांची माहीती दिली. व त्यांच्यासोबत रंगपंचमी साजरी केली. यावेळी वेगवेगळे रंग चेहऱ्यावर लावले व पाहूण्यांनी ही सर्वांच्या चेहऱ्याला रंग लावले. सर्वांच्या चेहऱ्याला लावले. विदेशी पाहूण्यांनी सदर कार्य क्रम स्वतः च्या कॅमेऱ्यात टिपून घेतला. व आमच्या देशात या सणांची माहीती सर्व जनतेपर्यंत पोहचवू असे सांगितले व हिंदूच्या सणांचे कौतुक केले.

# भटकळला हव्यात कसाबसारख्या सुविधा

**बंगळुरू :** दिल्ली, पुणे, वाराणासी आणि हैदराबादसह देशभरात अनेक ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटाचा मास्टरमाइंड दहशतवादी अहमद सिद्दीबापा उर्फ यासिन भटकळ याला मुंबई बॉम्बस्फोटातील दहशतवादी अजमल कसाबसारख्या सुविधा हव्या आहेत. तशी मागणीच त्याने कोर्टात केली आहे.

सोमवारी यासिन भटकळने जिल्हा सत्र न्यायालयात याचिका दाखल केली. त्यात त्याने ही मागणी केली आहे. त्याने या याचिकेतून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी करण्यास विरोध केला आहे. कोर्टात सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची परवानगी देण्याची मागणी त्याने केली आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे वकिलांशी संवाद साधताना अडचणी येत असल्याचं त्याचं म्हणणं आहे.

यावेळी त्याने कसाबचंही उदाहरण दिलं. सर्वोच्च न्यायालयाने कसाबला फेयर ट्रायल करण्याची परवानगी दिली होती. आपल्या वकिलांशी गुप्त चर्चा करण्याचा अधिकारही कसाबला दिला होता. कसाबला या सुविधा मिळू शकतात तर भारतीय संविधानानुसार मला या सुविधा का दिल्या जात नाहीत, असा सवाल भटकळने याचिकेत उपस्थित केला आहे.



# औषधांच्या 'एमआरपी' विक्रीतून रुग्णांची लूट

**मुंबई :** खासगी रुग्णालयांसह औषधकंपन्या आणि विक्रेते यांच्याकडूनही रुग्णांची अनिर्बंध लूट होत असते. मात्र हा दावा औषधविक्रेत्यांकडून फेटाळला जातो. विक्री किंमत अतिशय कमी असली तरीही छापील किंमतीलाच औषधे विकली जातात. विक्री किंमतीच्या किती पट नफा मिळवायचा याचे स्पष्ट निर्देश अद्याप नसल्याने रुग्णांची लूट होते, हे रुग्णांकडून घेतलेल्या काही औषधांच्या बिलांतून स्पष्ट झाले आहे.

औषधविक्रेत्याने औषध कंपनीकडून आठशे रुपयाने विकत घेतलेल्या एका औषधाची छापील एमआरपी (कमाल किरकोळ दर) २९६७ रुपये आहे. रुग्णालादेखील हे औषध त्याच किंमतीने विकण्यात



आले आहे. एमआरपी इतक्याच दराने औषधविक्रेते औषधांची विक्री करत असल्याने त्या विक्री किंमतीवर रुग्णाला आक्षेप घेता येत नाही. याचाच फायदा घेत या बिलानुसार जवळजवळ २७० पट नफा औषधविक्रेत्याने मिळवला आहे. कर्करोगावर उपचार सुरू असलेल्या रुग्णाने पाठवलेल्या बिलांमध्येही औषधांची मूळ खरेदी किंमत आणि एमआरपी यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक दिसून येतो. औषधविक्रेत्याने हे औषध १०५० रुपयांना कंपनीकडून विकत घेतले आहे, मात्र या औषधाची एमआरपी ३६२० रुपये आहे. विक्रेत्याने त्याच दराने हे औषध रुग्णाला विकले आहे, यातही २४० पट नफा औषधविक्रेत्याने मिळवल्याचे बिलामधून स्पष्ट होते. एमआरपीपेक्षा अधिक नफा विक्रेत्याला घेता येत नसला तरीही खरेदी किंमतीपेक्षा दोनशेपट नफा विक्रेत्याने यातून उकळला आहे.

गेल्या काही वर्षांत खासगी रुग्णालयांनी स्वतः औषधांची दुकाने सुरू केली आहेत. तिथे होणाऱ्या औषधांच्या विक्रीवर कुणाचेही नियंत्रण नाही. औषधेदेखील त्याच दुकानांमधून घेण्याची सक्ती केली जाते. या लॉबीमुळे किरकोळ औषधविक्रेतेही धास्तावले आहेत. या दोन्ही घटकांकडून रुग्णांची बिलामधून लूट केली जात असल्याचे चित्र मुंबईमध्ये दिसते.

अनेक दुर्धर आजारांवरील औषधेदेखील अत्यावश्यक औषधांच्या यादीमध्ये मोडत नाहीत. त्यामुळे त्यांच्या किंमतीवर नियंत्रण राहत नाही. हे नियंत्रण आणण्याची गरज असल्याचे स्पष्ट मत उमेश खके व्यक्त करतात. एमआरपीमध्ये थोडीफार सूट देऊन औषधविक्रेता ही औषधे रुग्णांना विकतो, मात्र तरीही त्याच्या नफ्याचे पारडे अधिक असते. त्यामुळे रुग्णांनाही छापील किंमतीपेक्षा कमी दराने औषध मिळाल्याचे समाधान मिळते, मात्र ते फसवे असल्याचे जगण्याच्या हक्काचे आंदोलनचे आरोग्यकार्यकर्ते विनोद शेंडे यांनी सांगितले.

# रेशन कार्ड आधारशी लिंक केल्याने २.७५ कोटी बनावट कार्ड उजेडात

**नवी दिल्ली-** डिजिटल रेशन कार्ड (शिधा पत्रिका) करून ते आधार क्रमांकाशी लिंक केल्यामुळे सरकारला सुमारे २.७५ कोटी बनावट आणि बोगस रेशन कार्ड पकडण्यास मदत झाली आहे. सबसिडीवरील धान्य घेण्यासाठी या रेशन कार्डचा वापर होत.



अन्न मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या माहितीनुसार, रेशन कार्डचे डिजिटलीकरण करण्याची प्रक्रिया जानेवारी २०१३ मध्ये सुरू झाली होती. पण मागील ४ वर्षांत त्याला चांगली गती मिळाली.

अन्न व ग्राहक संरक्षण मंत्री रामविलास पासवान म्हणाले की, आम्ही वार्षिक १७,५०० कोटी रूपयांचा सबसिडी असलेला गहू, तांदूळ आणि इतर धान्य वितरणात होत असलेला घोटाळा पकडला आहे. वास्तवात ती प्रत्यक्ष बचत नाही कारण आता गरजूंची संख्या वाढलेली आहे. तुम्ही असे म्हणू शकता की, आता खऱ्या गरजवंतांना याचा फायदा होत आहे.

सरकारी आकडेवारी पाहता राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यातंर्गत (एनएफएसए) लोकांना २३.१९ कोटी रेशन कार्ड वितरीत करण्यात आले होते. रेशन कार्डचे डिजिटलायजेशन आणि त्याला आधारशी जोडण्याची प्रक्रिया ८२ टक्के पूर्ण झाली आहे. जसजसे काम पुढे सरकेल बनावट रेशन कार्ड यंत्रणेबाहेर होतील.

खाद्य मंत्रालयानुसार, रद्द करण्यात आलेल्या रेशन कार्डमध्ये ५० टक्के उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, राजस्थान, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशमधूनही मोठ्या संख्येने रेशन कार्ड रद्द करण्यात आले आहेत.

# ज्येष्ठ नागरिक विरंगुळा संस्था, भाईदर (पूर्व) येथे 'ओमसाई संस्था, (गुंदवली) अंधेरी' या संस्थेच्या नाट्य कलावंतानी सादर केली राजमाता जिजाबाई यांच्या जीवनावर आधारीत 'राजमाता जिजाऊ' या ऐतिहासिक एकांकीका

ज्येष्ठ नागरिक विरंगुळा संस्था, भाईंदर (पूर्व ) येथे रवि. दि.२५ फेब्रुवारी रोजी सायं. 'ओमसाई संस्था, (गुंदवली) अंधेरी' या संस्थेच्या नाट्य कलावंतानी राजमाता जिजाबाई यांच्या जीवनावर आधारीत 'राजमाता जिजाऊ' या ऐतिहासिक एकांकीचे साभिनय वाचन केले. सत्यवान धुरी आणि त्यांचा आठ कलाकारांनी संवादातून सादर केलेल्या ७० व्या प्रयोगाने विरंगुळा संस्थेचे सदस्य अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन गेले होते.

नाट्यवाचनानंतर विरंगुळा संस्थेच्या ज्येष्ठ सदस्यांचे वाढदिवस याच नाट्य कलावंतांच्या हस्ते शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले.

या कार्यक्रमाला मीरा-भाईंदर शिवसेना शहरप्रमुख धनेश पाटील, उपशहरप्रमुख शंकर वीरकर, एसएम पब्लिक स्कूलचे संचालक श्रीपाद मोरे, नाटकार सदाशिव चव्हाण, शंकर जंगम, इत्यादी आवर्जून उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते नाट्य कलाकारांचा तसेच विरंगुळा संस्थेचे सल्लागार सदस्य साहित्यिक, कवी डॉ. लक्ष्मण शिवणेकर यांचाही सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचालन विरंगुळा संस्थेचे अध्यक्ष दिलीप पवार यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.






हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)